# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** रावनवाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0103 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 03:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 05/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2025
**Time From (वेळेपासून):** 12:44 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/03/2025 **Time (वेळ):** 03:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 03:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आरोपीचे राहते घर झिलमीली ताज,गोंदिया

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री राधेश्याम निलंकठ मटाले

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** निलंकठ मटाले

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिंधिटोला , गोंदिया,रावनवाडी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिंधिटोला , गोंदिया,रावनवाडी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850365001

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री खुमेश भोजराज वघारे | | वडील का नाम : भोजराज वघारे | 1. झिलमीली, रावार्ड क्र1 झिलमील,गोंदिया,रावनवाडी, गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पो.स्टे.ला. तक्रार प्राप्त होताच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | ध्वनी उपकरणे | दोन 32gb क्षमतेचे सॅनडीक्स | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | कंपनीचे मेमरीकार्ड | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | 1 विवो कंपनीचा v40 मॉडेल असलेला मोबाईल | 20,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | हजेरी पुस्तक | जप्ती पत्रक 2 प्रमाणे कागदपत्रे | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2 पाचशे रु.दराच्या भारतीय चलनी नोटा | 1,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2 शंभर रु.दराच्या भारतीय चलनी नोटा | 200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

21,200.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
दिनांक. 05.03.2025

नांवः- श्री राधेश्याम निलंकठ मटाले, वय 57 वर्ष, धंदा-शेतमजुरी, रा. सिंधिटोला (झिलमीली), पोष्ट कामठा, ता. जि.गोंदिया मो. क्र. 9850365001

मी आज दिनांक 05.03.2025 रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, उपरोक्त पत्त्यावर राहत असुन शेतीचे कामे करतो. मला सन 2024 मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलचे बांधकाम करणा-या मजुरांच्या मजुरीचे हजेरीपट (मस्टर) तयार करुन पंचायत समिती गोंदिया येथे मंजुरीस पाठविण्याकरीता रु. 1600/- द्यावे लागतील असे सांगुण लाचेची मागणी करीत असल्याने गै.अ. खुमेश भोजराज वघारे, रोजगार सेवक, ग्रामपंचायत झिलमीली यांचेविरुध्द कायदेषिर कारवाई होणेस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे तोंडी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
दिनांक 05.03.2025
नांवः- श्री राधेश्याम निलंकठ मटाले, वय 57 वर्ष, धंदा-शेतमजुरी, रा. सिंदीटोला (झिलमीली), पोष्ट कामठा, ता. जि.गोंदिया मो. क्र. 9850365001

मी समक्ष हजर राहुन सांगतो कि, वर नमुद पत्यावर कुटुंबासह राहत असुन शेतमजुरीचे काम करतो, मला वाचता येते परंतु बरोबर लिहता येत नाही.
ग्राम सिंदी टोला, भगवान टोला, चिरामन टोला, कामठा टोली व झिलमीली असे मिळुन झिलमीली गट ग्रामपंचायत आहे. मला सन 2024 मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाले आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत घरकुल बांधकाम साहीत्याकरीता 1,20,000/-रुपये व घरकुलाचे बांधकाम करणा-या मजुरांच्या मजुरीचे 28,000/-रुपये असे एकुण 1,48,000/-रुपये अंदाजे अनुदान शासनाकडुन मिळत असते.
त्यानुसार दिनांक 17 सप्टेंबर 2024 ला मंजुर घरकुलाचा पहीला हप्ता रु. 15,000/- माझे इंडिया पोष्ट पेमेंट्स

बँकेचे खाते क्रमांक 032410194945 मध्ये जमा झाले होते. तेव्हा झिलमीली गट ग्रामपंचायत येथील रोजगार सेवक श्री खुमेश वघारे यांनी मला प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचा पहीला हप्ता जमा झाल्याचे सांगुन घरकुलाचे बांधकाम सुरु करण्यास सांगीतले. त्यानंतर मी घरकुलाचे बांधकाम सुरु केले. घरकुलाचे बांधकाम करणा-या मजुरांचे हजेरीपट (मस्टर) तयार करुन ते मंजुरीकरीता पंचायत समिती गोंदिया येथे पाठविणे इत्यादी कामे ग्रामपंचायत झिलमीली येथील रोजगार सेवक श्री.खुमेष वघारे हे करीत असतात. दिनांक 22.02.2025 रोजी घरकुलाचा दुसरा हप्ता 70,000/- रुपये माझे इंडिया पोष्ट पेमेंट्स बँकेचे खाते क्रमांक 032410194945 मध्ये जमा झाले आहे.

त्यानंतर दिनांक 23.02.2025 रोजी रोजगार सेवक खुमेश वघारे यांना भेटुन माझे नावाने प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत मंजुर असलेल्या घरकुल बांधकाम करणा-या मजुरांच्या मजुरीचे हजेरी पट (मस्टर) तयार करुन सादर करण्याकरीता विनंती केली असता रोजगार सेवक खुमेश वघारे यांनी मला म्हटले की, तुमच्या घरकुल बांधकाम केलेल्या मजुरांचे हजेरीपट (मस्टर) तयार करुन मंजुरीकरीता पंचायत समिती गोंदिया येथे पाठवुन देतो. परंतु त्यामोबदल्यात मला 1600/-रुपये दयावे लागतील असे म्हटले. रोजगार सेवक श्री खुमेश वघारे हे घरकुल बांधकाम करणा-या मजुरांच्या मजुरीचे हजेरी पट (मस्टर) तयार करुन मंजुरीकरीता पाठवण्यासाठी मागत असलेले रु. 1600/- ही लाच असल्याची माझी खात्री झाली. ते मागत असलेले रुपये 1600/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होण्याकरीता आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे येवुन तक्रार देत आहे. माझे रोजगार सेवक श्री.खुमेष वघारे यांच्याषी कोणतेही जुने वैमनस्य किंवा आर्थिक देवाण घेवाण नाही.

मी दिलेल्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच श्री.अमित भाउदास बडोले, वय 36 वर्ष, पद-ग्राम महसुल अधिकारी वर्ग-3 व पंच श्री. गिरधारी पुनाजी सोनेवाने, वय 55वर्ष, पद- ग्राम महसुल अधिकारी, वर्ग-3, दोन्ही कार्यालयाचा पत्ता पहीला माळा, महसुल विभाग रुम क्र. 13, तहसिल कार्यालय, प्रषासकीय ईमारत, जयस्तंभ चौक, ता.जि.गोंदिया यांची माझेषी ओळख करुन दिली व दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचुन व मला त्याबाबत विचारणा करुन त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 1600/- ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 02 चलनी नोटा व 100 रुपये दराच्या 06 चलनी नोटा त्यांच्याकडे जमा केल्या. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणा-या अँथ्रासीन पावडरची वैषिष्ट्य सांगुन त्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक आपल्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखवुन रू. 500/- दराच्या 02 व रु. 100/- दराच्या 06 चलनी नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका लिफाफ्यात टाकुन सदर लिफाफा ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार यांनी दिलेल्या सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी व्हाईस रेकॉर्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत मला व पंचास सविस्तर माहीती देवुन 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4185YVFRY4AF असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्दतीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कशा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत मला व दोन्ही पंचाना समजावुन सांगीतले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फॉर्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्ड फाईल नसल्याची खात्री करुन सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत सापळा बॅगमध्ये ठेवण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी गै.अ. खुमेश वघारे यांच्याविरुध्दची लाच मागणीची पडताळणी कार्यवाही मौजा झिलमीली येथे गै.अ. यांचे राहाते घरी जावुन करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला झिलमीली तलावाजवळ जाण्याकरीता माझे दुचाकी वाहनाने रवाना करुन 12.00 वा. पर्यंत तिथे पोहचुन हजर राहण्यास सांगीतले.
पोलीस निरीक्षक श्री राजीव कर्मलवार यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे वेळ 12.00 वा. मौजा झिलमीली तलावाजवळ पोहचुन तिथे थांबुन राहीलो. थोडयावेळाने त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री राजीव कर्मलवार हे दोन्ही पंच व

सापळा पथकासह हजर आले. सर्वांनी आपआपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अषाप्रकारे ठेवुन त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही करण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार यांनी मला व पंचाना लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी घ्यावयाचे दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करुन अंगझडतीत मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी त्यांचे कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ज्यात सॅनडिस्क कंपनीचा 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र. 4185YVFRY4AF चा मेमरी कार्ड टाकुन असलेला वेळ 12.44 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन गळयामध्ये दोरीचे सहायाने शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.
त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन मौजा झिलमीली येथे तक्रारदार यांचे राहाते घरी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता माझे मोटार सायकल क्र. एम.एच-35 एल- 7238 ने पाठविण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री कर्मलवार व पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याच ठिकाणी थांबुन राहीले.
मी गै.अ. वघारे, रोजगार सेवक यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह पो.नि. श्री कर्मलवार व सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पो.नि. कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 13.27 वाजता बंद केले.
"मी, पंच क्र. 1 यांचेसह गै.अ. रोजगारसेवक श्री. खुमेश वघारे यांचेषी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्यास मौजा झिलमिली येथे पोहचल्यावर मी आपले मोबाईलचे स्पिकर सुरु करुन गै.अ. यांचे मोबाईलवर फोन लावुन वगारेजी कहा हो असे विचारलेवर गै.अ. यांनी घरपेच हु असे सांगीतल्याने मी त्यांना इधर आया तो मिल जावुंगा असे म्हटले तेव्हा गै.अ. यांनी ठिक है असे म्हटल्याने त्यांना भेटण्यास त्यांचे घरी गेलो. घरी गेल्यावर त्यांचे घरी हजर असलेल्या ईसमास वघारेजी नमस्ते असे म्हणुन वघारेजी आहेत का असे विचारले असता त्यांनी हवं म्हटल्यावर मी त्यांना बुलाओना असे म्हटले त्यांनंतर गै.अ. वघारे हे बाहेर आले त्यांना मी अपने मस्टर का क्या हुआ कुछ बताऐ नही असे म्हटले असता गै.अ. यांनी हो गया असे म्हटले,त्यावर मी त्यांना उस दिन बोलणी हो गयी कुछ कम करोना साहाब असे म्हटल्यावर त्यांनी याच्यात का कमी करुन टाकल माणुस असे म्हटले तेव्हा मी त्यांना सोळासे रुपये जास्त होतात असे म्हटले, त्यावर गै.अ.यांनी तुम्ही बारासौ देवुन दयाल मी घरीच आहो असे म्हटल्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन तिथुन निघुन परत आलो.
त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकुन गै.अ. वघारे, रोजगार सेवक यांनी रु. 1600/- लाच रक्कमेची मागणी करुन पंचासमक्ष तडजोडीअंती रु. 1200 लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची खात्री केली. त्यावरुन पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही गै.अ. यांचे रहाते घरी मौजा झिलमीली येथेकरण्याचे ठरविले.
त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन माझेकडे मिळुन आलेल्या वस्तु मला वेळीच परत केले. पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी सापळा कार्यवाही दरम्यान घेण्यात येण्या-या दक्षतेबाबत मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सुचना समजावुन सागीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी टॅम्प सुटकेसमध्ये लाच रक्कमेचा लिफाफा पंच क्र. 2 यांचेकडे दिला त्यांनी त्या लिफाफ्यामधुन अथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 2 चलनी नोटा व 100/- दराचे 6 चलनी नोटा असे एकुण रू. 1600/- बाहेर काढुन त्यापैकी रुपये 100/- दराचे 4 चलनी लिफाफ्यातच ठेवल्या व रु. 500/- दराच्या दोन व रु. 100/- दराच्या दोन भारतीय चलनी नोटा असे एकुण रु. 1200/- बाहेर काढुन माझे फुलपॅंटच्या उजव्या खिष्यामध्ये अलगद ठेवुन दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 4185YVEK611Q असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन त्यांचे कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक कर्मलवार यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी वेळ 14.39 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाहीकरीता गै.अ.यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवीत ठेवुन दोरीचे सहायाने माझे गळ्यामध्ये शर्टचे आत

लटकवुन दिला व मला पंच क्रमांक 1 यांचेसोबत गै.अ यांचे राहाते घर मौजा झिलमीली येथे माझे मोटार सायकले पंच क्रमांक 1 यांचे सोबत पाठविण्यात आले. त्यानंतर आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक कर्मलवार हे पंच क्रमांक 2 व त्यांचे सापळा पथकासह शासकीय व खाजगी मोटार सायकलेन गै.अ. यांचे घराजवळ पोहचुन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत दबा धरुन बसुन माझे नियोजीत ईषा-याची वाट पाहत बसले.
"मी पंच क्र. 1 यांचेसह गै.अ. खुमेश वघारे यांचे घरी मौजा झिलमीली येथे गेलो असता गै.अ. हे त्यांचे घरी समोरच्या हॉलमध्ये बसुन होते. त्यानंतर मी गै.अ.यांना अभी मस्टर जल्दी भेज दो नही तो मेरा मरणा हो जायेंगा असे म्हटल्यावर गै.अ. यांनी तुम्हारा काम ओके हो गया, असे म्हणुन फंड बोहत लेट आ रहे है बोल नही सकता असे म्हटले, त्यावर मी त्यांना अभी फंड नही रहता तो हमको प्रधानमंत्री आवास योजना देता ही नही ना, असे म्हटल्यावर गै.अ. यांनी सत्तावीस तारीख को ऑनलाईन मार दिया, अभी चार महिनेसे हमारे लेबर बैठे है उनको तो पेमेंट नही मिले मै आपको जबान भी नही दे सकता कि पंधरा दिन मै आयेंगे क्या बिस दिन मे आयेंगे असे म्हटले. त्यानंतर मी त्यांना तुमने बारासौ बोले तो बारासौ दिया असे म्हणुन आपले फुलपॅटच्या उजव्या खिषातुन लाच रक्कम काढुन त्यांचेकडे देवुन गिनलो पहिले असे म्हटल्यावर गै.अ यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन ते बसुन असलेले बाजुच्या खिडकीमध्ये ठेवुन दिली. त्यांनतर पंच क्र. 1 यांचेसह गै.अ. यांचे घराचे बाहेर समोर रोडवर येवुन मी गै.अ.यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इषारा केल्यावर आपण पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली". याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरीक्षक कर्मलवार यांनी पंचनामा मध्ये घेतल्या आहेत.

तरी आरोपी श्री खुमेश भोजराज वघारे वय 28 वर्ष, व्यवसाय-रोजगार सेवक, ग्रामपंचायत झिलमीली, रा.वार्ड क्र.1 झिलमीली, पो.कामठा, ता.जि.गोंदिया यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करुन मला प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाचे बांधकामाचे मजुरांच्या मजुरीचे हजेरीपटाचे (मस्टर) तयार करुन पंचायत समिती गोंदिया येथे मंजुरीस पाठविण्याच्या मोबदल्यात रू. 1600/- लाच रकमेची मागणी करून पंचासमक्ष तडजोडीअंती रु. 1200/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारून गैर फायदा घेतला आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन मला पंचासमक्ष वाचुन दाखविले माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

(राधेश्याम निलकंठ मटाले)
रा.सिंदीटोला ता.जि.गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VAIBHAV SHRIRANG PAWAR(SI (Sub-Inspector)) / 15101000402VSPM87011 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

राधेश्याम मटाले

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Bawankule

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VAIBHAV SHRIRANG

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 15101000402VSPM870

पो. हवा. आनंद बावनथडे
ब.नं. ४९२
स्टे. डा. अंमलदार
पो.स्टे.रावणवाडी

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)